Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832 A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune 411004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
स.नं.८३२ ए, फा.प्लॉट नं.१७८, व
१७९, बालचित्रवाणी जवळ,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर
पुणे ४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020) 25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे / तातडीचे

क्र.रा.मं./परीक्षा-७/४५२
पुणे ४११ ००४.
दिनांक- ०२/०२/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषयः- फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भः- १.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दि.२४/११/२०१७.
२.महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.कशिमं/शारेप/सहा/२०२५/१३०० दि.०४/१२/२०२५.
३.या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा-७/१६६ दि.१६/०१/२०२६ चे पत्र
४.कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे संकीर्ण-३८२६/प्र.क्र.०३/एस.डी.२,दि.३०/०१/२०२६ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येते. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ५ मध्ये याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिडीएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२५ चा निकाल जानेवारी २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळांकडे सादर करण्यासाठी दि.३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

याबाबत संदर्भ पत्र क्र. ३ च्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर केला असता, शासनाने संदर्भ क्र.४ नुसार फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे दिनांक १८/०२/२०२६ पर्यंत सादर करण्यास मुदतवाढ दिलेली आहे.

तरी उपरोक्तनुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरून याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 508
कोल्हापूर -४१६००४
दिनांक:- 03 FEB 2026

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय:- फेब्रु./मार्च- २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन फेब्रु./मार्च- २०२६ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास राज्य मंडळ, पुणे यांचे वरील प्रकटनाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

G EXAM-7-2026-doc-3